E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# दलित कविता : एक परामर्श

**जानकी माणिकराव जाधव**
संशोधक विद्यार्थीनी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

**प्रस्तावना:**

फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन प्रवाहापासून वंचित राहिलेल्या अनेक घटकांनी गुलामगीरीचे बंध झुगारून स्वतः प्रबोधनाचे मुक्ती मार्ग तयार केले. यातूनच साठोत्तरी वाङ्मयीन प्रवाह 'दलित वाङ्मयाचा' उगम झाला आत्मभानातून हक्काची जाणीव होऊन त्याचेखाली रगडले गेलेला समाज मुक्तीसाठी होणाऱ्या अंतरिक दहाने पेटायला लागला. विशिष्ट प्रकारचा अन्याय सामुदायिक रीतीने जाणवायला लागल्यावर त्यांच्या अस्मिता जागृत झाल्या आणि त्यांनी मनुवादी विचार प्रणालीचा नकार देत 'विद्रोहाचा' टाहो फोडला. "स्वातंत्र्य कोणत्या गाढवीचे नाव आहे? 'कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही." अशा शिर्षकाच्या माध्यमातून प्रस्थापित समाज व्यवस्थेला प्रश्न विचारू लागले.

**मुख्य शब्द:** दलित कविता, दलितांच्या जाणीव, दलित कवितेचे स्वरूप.

१९६० नंतर मराठी साहित्य जगात अनेक प्रवाह निमाण झाले. त्यांत दलित टाहोफोडला. ग्रामीण, स्त्रीवादी आदिवासी इत्यादी प्रवाह होत. मराठी साहित्यात दलित साहित्य प्रवाहाने आपले वेगळे स्थान सिद्ध तरकलेच त्याचबरोबर मराठी साहित्याचे दालन ही समृद्ध केले. दलित साहित्याविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात - "कोणताही साहित्य प्रवाह हा एकाएकी व उगीचच्या उगी निर्माण होत नाही त्याच्या निर्मितीमागे काही कारणे असतात प्रेरणा, प्रयोजन, प्रवृत्ती व हेतू असतात. बदलती नवी साहित्यदृष्टी, बदलते साहित्यमूल्य जसे त्यांच्या मुळाशी असता बरेच बदलते जीवन बदलता संदर्भबदलत्या राजकीय घडमोडी याही असतात. जसा काळ तसे साहित्य."

डॉ. मुलाटे यांच्या मतावरुन असे स्पष्ट हाते की, कोणत्याही साहित्य प्रवाहाच्या निर्मितीमागे प्रेरणा, प्रयोजन, हेतू तर असतोच तसेच प्रगल्भ अशी साहित्य दृष्टी व साहित्य मुल्यही असतात. तसेच बदलत्या राजकीय, सामाजिक, घडामोडीचांही परिणाम साहित्यावर होत असतो. याचबरोबर केशव मेश्राम यांच्या मते, 'दलित साहित्य ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाने जागृत झालेल्या अस्मितेच्या शोधाने सर्व जाती, धर्म, विचार, रुढी, संकल्पना, ऊक्ती, ग्रंथ आणि रुढी यांना

नकार देणाऱ्या आणि नवसंस्कृतीच्या निर्माणाची समतायुक्त सम्यक वाटचाल करणाऱ्या संघर्षाची अस्तित्त्वात असलेली राजसत्ता होऊ पाहणारी ठळक वाटचाल आहे." केशव मेश्राम यांच्या मते दलित साहित्य हे नवविचार व नवसंस्कृतीची वाटचाल करणारे साहित्य हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्त्वाने जागृत झालेले आहे. दलित साहित्याची संकल्पना ही मुंबई येथे झालेल्या पहिल्या दलित साहित्य संमेलनात भांडण्यात आली. ह्या संमेलनाचे अध्यक्ष अण्णाभाऊ साठे यांनी आपले विचार मांडताना म्हटले की, ‘ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून दलितांच्या तळहातावर तरली आहे." अण्णाभाऊ साठे यांचे हे मत क्रांतीकारक होते.

वेदना, विद्रोह आणि नकार ही स्वरुप वैशिष्ट्ये असलेल्या दलित साहित्याने मराठी साहित्य विश्वात आकृतिबंध आणि आशयाच्या पातळीवर कथा, कविता, आत्मकथन, वैचारिक आणि समीक्षेचे प्रवेश समृद्ध केले. दलित कवितेचा विचार करीत असतांना दलित कवितेची दमदार सुरुवात ज्या कवींनी केली ते कवी आणि त्यांच्या कविता दलित साहित्यामध्ये लक्षणीय नोंद करणाऱ्या ठरल्या. कमी शब्दात परंतु खुप मोठा आशय काव्यातून व्यक्त होत असतो. दलित कवींनी अश्याच प्रकारे आपल्या वेदना, विद्रोह, दलितांवरील अन्याय हे काव्याद्वारे मांडलेले दिसून येतात. दलित कविता म्हणजे क्रांतीचा उद्घोष करणारी तसेच माणसाच्या अंतकरणाला भिडणारी, बधीर असलेल्या मेंदुला चालणा देणारी, परिवर्तनवादी विचारांचा ध्यास घेऊन येणारी, वास्तवतेची जाण असणारी व महत्त्वाचे म्हणजे दलित कवितेत कल्पनेच्या जगाला थारा नाही आणि विद्रोह हाच दलित कवितेचा स्थायी भाव आहे.

दलित साहित्यात दलित कवितेचे योगदान अधिकतर आणि महत्त्वाचे ठरले. दलित कविता ही विचारशील व उत्कट स्वरुपाची असलेली दिसून येते. या कवितेची पार्श्वभूमी पाहिली तर लोकशाहीरांची परंपरा येथे लाभलेली दिसून येते. पूर्व काळातील किसन फागू बनसोडे, शाहिर हेगडे, अण्णाभाऊ साठे, ना. रा. शेंडे, नागोराव कव्वाल, शाहीर ऊमराव शेख, वामनराव कर्डक इ. लोकशाहीरांची पार्श्वभूमी पुढील काळातील दलित कवींना लाभलेली आहे. अण्णाभाऊ साठे यांच्या पुढील ओळी प्रेरणादायी ठरल्या.

**‘जग बदल घालुनी घाव**

**सांगुनी गेले मला भीमराव"**

**-अण्णाभाऊ साठे**

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

दलित कविता ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतिकारी विचारांची व त्यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन हे काव्य साकारले त्यातूनच नामदेव ढसाळ, दया पवार, बाबुराव बागूल, यशवंत मनोहर यांची कविता सर्वदूर पोहचली. तसेच भारतीय पातळीवर पोहचली. अन्याय, अत्याचार करणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध बंड करून तो आपल्या काव्यातून प्रस्थापित व्यवस्थेने मांडलेल्या रुढी परंपराचा निषेध करते तसेच व्यथा वेदनायुक्त भूतकाळ, एकीकडे फुले-शाहू-आंबेडकर यांच्या कार्यकत्वृत्वाने भारावून गेलेली ही पिढी मनुप्रणित व्यवस्थेविरुद्ध बंड करते, विद्रोह करतांना दिसुन येते. दलित कवितेतुन आशय अभिव्यक्तीचे नव अविष्करण घडून आले माणसाला माणूस म्हणून जगता यावे ही आकांक्षा ठेवून ही कविता मुल्यदर्शी जाणिवा प्रकट करतांना दिसते.

मराठी साहित्य जगतात दलित कवितेचे हे वेगळेच अनुभव विश्व ठरले. यात बाबूराव बागूल (वेदाआधी होतास तू), वामन निंबाळकर (गावकुसाबाहेरील कविता) यशवंत मनोहर, (उत्थान गुंफा, काव्य भीमायन, मुर्तीभंजन, जीवनायन, प्रतीक्षायन, अग्नीचा आदिबंध, स्वप्नसंहिता), दया पवार (कोंडवाडा), अर्जुन डांगळे, (छावणी हालते आहे), ज.वि. पवार, (नाकेबंदी), त्र्यंबळ सपकाळे (सुरुंग), नामदेव ढसाळ (गोलपिठा वेळ, गांडू बंगीचा, तुही इयत्ता कंची) प्रल्हाद चेंदवणकर (ऑडीट), केशव मेश्राम (उत्खनन), राम दोतोंडे जेव्हा लेखनी बनते, गल्ली बदललेला मोर्चा) या कवींच्या कवितेतून दलित शोषित माणसाचा आवाज सर्वांपर्यंत पोहचला गेला. तसेच मानव मुक्तीचा ध्यास ह्या कवितेने घेतलेला दिसून येतो.

नंतरच्या काळातील दलित कवितेचा विचार करीत असतांना ह्या काळातील कविता वेगळेच अविष्करण करतांना दिसते. ह्या कवितेला नवे आयाम, नवी वळणे प्राप्त झाली यात भुजंग मेश्राम, अरुण काळे, लोकनाथ यशवंत, महेंद्र भवरे, उत्तम कांबळे, उत्तम अंभोरे, कैलास पगारे, दिपक त्रिभुवन, अविनाश गायकवाड, किशोर घोरपडे, महेश मोरे यांचा समावेश होतो. ह्या दलित कवितेची व्यापकता दिसून येते. ह्या काळात बदलतो सामाजिक रुप, सामाजिक परिवर्तनवादी चळवळ मंदावलेली दिसून येते. भांडवलशाही व्यवस्था बदलते राजकीय सत्ताकरण याचबरोबर धार्मिकतेचे बदलते रुप यातून संघर्ष वाढत गेला ह्या संघर्षाचा वेध दलित कवी काव्यातून घेतांना दिसता.

दलित कवितेतून नव्या जाणिवांचे अविष्करण घडले या कवितेने सुक्ष्म व व्यापक अश्या स्वरुपाचे अनेक स्तर साकारलले दिसतात. कवी अरुण काळे या संदर्भात आपल्या 'रॅाक गार्डन' या कवितेत लिहितात -

त्याच्या हाकेला ओ देऊन

पिंपळाने बाहेर काढली
काषाय वस्त्रे मनात ठेवलेली
झटकले अंग
आणि पळून गेला मुंज्या
उडून गेली वटवाधळे
गळून पडली वडाची साल
पिंपळाला लावलेली

**- रॉक गार्डन, पृ. ३५**

या कवितेतून मूल्यव्यवस्थेशी संबंधीत असलेले प्रतिमाविश्व साकारले. दलित कविता ह्या प्रस्थापित व्यवस्थेविरुद्ध चिंतन व्यक्त करतांना दिसते. येथील समाजव्यवस्थेतील दांभिकता माणसा-माणसांमधील भेद निर्माण करणारी धार्मिक परंपरा, समकालीन वास्तव, धर्म-कर्मकांड, थोतांड, धार्मिकतेचा चाललेला उन्माद हे सर्व गंभीर प्रश्न आहेत. याचबरोबर बाबासाहेब आंबेडकरांचे विचार, बौद्ध संस्कृतीने दिलेले अत्तदीपचे प्रकाशमय मार्ग या सर्वांचा वेध नव्या दलित कविता घेतात. यात अरुण काळे (रॉक गार्डन आयरनचे शहर), लोकनाथ यशवंत (आता होऊन जाऊ द्या, पुन्हा चाल करु या), धम्मपाल रत्नाकर (हॉटेल माझा देश आहे), महेंद्र भवरे (महासत्तेचे पीड़ा दान, चिंताक्रांत मुलखाचे रुदन), वळवंत कांबळे (निषेध, गावभोग, देव मायनस धर्म) उत्तम अंभोरे यांचा (पत्ता बदलत जाणारा गनीम), अविनाश गायकवाड (जंजाळ), उत्तम कांबळे (किनाऱ्यावरचा कालपुरुष, पाचव्या बोटावर सत्य), याचबरोबर दलित कवयित्रीनीही आपल्या व्यथा, वेदना काव्यातून मांडलेल्या दिसून येतात. यात कुमुद पावडे, ज्योती लांजेवार, प्रज्ञा पवार, सुरेखा भगत, हिरा बनसोडे, प्रतिभा अहिरे यांनी शोषित पीडित स्त्रियांचे भावविश्व साकारलेले दिसते.

दलित कवितेचे प्रतिमाविश्व आणि भाषेचे अविष्करण व्यापक आहे. मानवी जीवन आणि सामाजिक जीवनाचे वास्तव चित्रण काव्यातुन मांडले गेलेले दिसून येते. शोषक शोषित वर्गाच्या अंतरंगाचे चित्रण काव्यातून मांडले गेले. आपण स्वीकारलेल्या बौद्ध संस्कृतीचे तत्त्वज्ञान फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचार प्रेरणेतून आपले अनुभव विश्व अधिकाअधिक समृद्ध करण्याचे काम दलित कवींनी केले.

दलित लेखक कवी यांनी आपल्या मनातील भावना प्रकट करण्यासाठी लेखनीचे साह्य घेतले. या व्यवस्थेने केलेले अन्याय अत्याचाराला आपल्या लिखाणातून नकार दिला. डॉ. बाबासाहेब

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

आंबेडकर हे दलितांचे कैवारी होते. दुःखीतांचे, वंचिताच जीवन सृष्टीचे रचनाकार होते. सहस्त्रावधी वर्षांच्या काळोखाला पुसुन टाकून नव प्रकाश निर्माण करणारे तेजोनिधीला भावसुमण अर्पण करणारी कविमने म्हणूनच सिद्ध झाली आणि पाहता पाहता शतावधी कवनांचा वर्षाव झाला ही अंतः प्रेरणा होती.

**संदर्भ :**

१) डॉ. वासुदेव मुलाटे १९६० नंतरचे दलित आत्मकथने एक परामर्ष साहित्य, समाज आणि परिवर्तन.

२) केशव मेश्राम, दलित साहित्याकडे अव्या कालटप्प्यावरून, अक्षर भाकीते.

३) सुमती लांडे: चळवळ आणि साहित्य.

४) अविनाश सांगोलेकर दलित साहित्य उगम आणि विकास.

५) डॉ. भगवान ठाकूर : आंबेडकरी साहित्य स्थिती आणि स्थित्यंतरे.